Order
O. S. to say



Exh. 21/D

CJJD, Radhanagari
23-2-26

रे. क. नं. १२/२०२६

राधानगरी येथील मे. सहदिवाणी न्यायाधिशसो
यांचे कोर्टात..................

एकनाथ विठ्ठल पाटील ... वादी

विरुध्द

श्री. कृष्णात गंगाराम रेपे ... प्रतिवादी

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.02.23 17:31:51 +0530

१. श्री. दत्तात्रय दौलु पाटील,
व.व. ६५, धंदा - शेती,
रा.सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
२.श्री. अरविंद पांडुरंग पाटील,
व.व. ५५, धंदा - शेती,
रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर,
३. श्री. संभाजी श्रीपती पाटील,
व.व. ४५, धंदा - शेती,
रा.सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
४.श्री. साताप्पा तुकाराम कांबळे,
व.व. ६७, धंदा - शेती,
रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर,
५.श्री. बळीराम पांडुरंग पाटील
व.व. ५३, धंदा - शेती,
रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर,
६.श्री. मानसिंग विनायक रेपे
व.व. ५०, धंदा - शेती,
रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर,

... थर्ड पार्टी अर्जदार

<u>सी. पी. सी. ऑर्डर १ रुल १० प्रमाणे अर्ज</u>

Assistant Suprintenden.

<u>यातील थर्डपार्टी अर्जदारतर्फे विनंती अर्ज की,</u>

(१) प्रस्तुतचा दावा यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई ताकीद होवुन मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे.

(२) मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणेजाणेसाठी पुर्वी गट क्र.१९९०,१९८७,१९८६,१९८५,१९८४, १९८३, २०७५,२०७४,२०७६,२०७७,२०७८,२०७९,२०८०,२०८१,२०९०,२०९१,२०९२,२०९३,२०८९, २०९४,२१४०,२१०१,२१३८,२१०६,२१०७,२१०८ व २१३९ या गट क्रमांकामधुन प्र.वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार तसेच सदरील नमुद केलेल्या गटातील शेतक-यांना येणे - जाणेसाठी दावा मिळकतीचे सरबांधावरुन पायवाट होती. सदरिल मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद पासुन यातिल प्र.वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार तसेच अन्य शेतकरी यांची शेती १ किलोमिटर अंतरावर असलेने सदरिल प्र.वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य लोकांना त्यांचे जामिनीमध्ये पिके घेणे अडचणीचे झालेले होते. त्यामुळे यातिल प्र.वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य लोकांची मिळून जवळजवळ ५० एकरापेक्षा अधिक जामिनीमधील पिकांची डोक्यावरुन ने -आण करणे तसेच पिकांची मशागत करणे प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतकरी यांना अडचणीचे ठरत होते. त्याकारणाणे यातिल प्र.वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतकरी यांनी दावा मिळकतीपासून पश्चिम बाजुस १ किलोमिटर अंतरापर्यत १२ फुट रुंदीचा रस्ता पिकांची ने - आण करणेकरिता तसेच सदरिल शेत जमिनीमध्ये पिके करणेकरिता केलेला होता व आहे.

(३) मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद रस्त्यास लागुन पश्चिम बाजुस गट क्र. १९९० मधील शेत मिळकत असुन सदरील गट क्र. १९९० पश्चिम बाजुस वादी व अन्य यांचे नावे असलेले गट क्रमांक आहेत.

(४) मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद रस्त्यास लागुन पश्चिम बाजुस गट क्र. १९९० मधील शेतक-यांनी प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार तसेच अन्य शेतक-यांना तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणे - जाणेसाठी आवश्यक असणारा १२ फुट रुंदीचा रस्ता सोडलेला आहे. तसेच दावा मिळकतीचे

Assistant Superintendent

पश्चिम बाजुचे शेतक-यांनी देखिल तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणे - जाणेसाठी आवश्यक असणारा १२ फुट रुंदीचा १ किलोमीटर रस्ता सोडलेला आहे. दावा मिळकतीचे पुर्व बाजुस तसेच दावा मिळकतीचे पश्चिम बाजुस १२ फुट रुंदीचा रस्ता तयार होता व आहे.

(५) यातील वादी यांनी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यतचा लांबीचा रस्ता प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतक-यांना तेली पाणंद ते ओढयापर्यत येणे - जाणेसाठी रस्ता सोडणेस नकार दिलेने यातिल प्र.वादी यांनी मा. तहसिलदार सो यांचेकडे रस्ता मागणी अर्ज दाखल केलेला होता. सदरिल कामी मा. तहसिलदार सो. यांनी जागेवर येवुन स्थळ पहाणी करुन तसेच यातिल वादी व प्र.वादी यांना योग्य ती संधी देवून तसेच तहसिलदार सो. यांनी गुणदोषावर काम चालवून ता. २२/१२/२०२५ इ. रोजी आदेश केलेला आहे. सदरील आदेशामध्ये मा. तहसिलदार सो राधानगरी यांनी मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०,१९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३,२०७५,२०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१, २०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणारा व तयार होणारा नविन रस्ता मंजुर केलेला आहे. तसेच सदरील रस्त्यास यातील वादी व अन्य शेतक-यांनी कोणताही अडथळा करणेचे नाही असे मा. तहसिलदार सो यांनी आदेशामध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. सदरील तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशाप्रमाणे मंडल अधिकारी सरवडे यांनी यातील वादी व प्र. वादी यांना ता. १२/०१/२०२६ इ. रोजी नोटीस काढुन ता. २०/०१/२०२६ इ. रोजी सदरील रस्ता खुला केला जाणार असलेने संबंधीत यातील वादी व प्र. वादी यांनी तसेच वर नमुद शेतकरी यांनी सकाळी ११ वाजता उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. त्यानंतर मंडल अधिकारी सरवडे यांनी यातील वादी व प्र. वादी यांना ता. १९/०१/२०२६ इ. रोजी पुन्हा नोटीस काढुन ता. २०/०१/२०२६ इ. रोजी सदरील रस्ता खुला केला जाणार होता. परंतु निवडणुक कामकाज सुरु असलेने सदरील रस्ता खुला करणेची पुढील तारीख कळविणेत येईल असे वादी व प्र. वादी यांना नोटीसीने कळविलेले आहे.

Assistant Superintendent

(६) त्यानंतर यातील प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतकरी यांनी ता.०७/०२/२०२६ इ. रोजी दावा मिळ्कतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळ्कतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यंतचा लांबीचा रस्ता प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतकरी यांना तेली पाणंद ते ओढयापर्यंत येणे - जाणेसाठी रस्ता खुला केलेला आहे. त्याकारणाने मा. तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशाप्रमाणेचा मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०, १९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३, २०७५, २०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१, २०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणरा व तयार होणारा नविन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यामधुन प्र. वादी तसेच थर्ड पार्टी अर्जदार व अन्य शेतक-यांनी वहीवाट चालु केलेली आहे.

(७) यातील थर्ड पार्टी अर्जदार व अन्य यांना दावा मिळ्कतीमधील १२ फुट रस्त्यामध्ये वहीवाट करणेसाठी कायदेशिर हक्क प्राप्त होतो याची संपुर्ण माहीती यातील वादींना असतांना देखील यातील वादी यांनी थर्ड पार्टी अर्जदार व अन्य यांना सदरील कामी आवश्यक पक्षकार न करता सदरचा साफ खोटा दावा दाखल केलेला आहे.

(८) त्याकारणाने सदरील कामी यातील थर्डपार्टी अर्जदार यांना या कामी प्रतिवादी म्हणून आवश्यक पक्षकार करणे न्यायचे दृष्टीने आवश्यक व आगत्याचे आहे.

(९) सदरील थर्डपार्टी अर्जदार यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ठ केलेस यातील वादी यांचे कांहीही नुकसान होणार नसून न्यायदानास मदतच होणार आहे.

(१०) याउलट सदरील थर्डपार्टी अर्जदार यांना सदर कामी प्रतिवादी म्हणून समाविष्ठ न केलेने यातील थर्डपार्टी अर्जदार यांचे अतोनात असे नुकसान होणार असून त्यांचे कायदेशीर हक्क डावलले जाणार आहेत.

Assistant Superintendent

(११) **सबब, थर्डपार्टी अर्जदार यांची विनंती की,**

वर नमुद कारणांचा विचार होवून यातील थर्डपार्टी अर्जदार यांना सदरील कामी प्रतिवादी म्हणून पक्षकार करणेत यावे ही विनंती.

राधानगरी

ता. २३.०२.२०२६

**प्रतिज्ञा**

आम्ही यातील थर्ड पार्टी अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज राधानगरी

ता. २३.०२.२०२६

**ॲफिडेव्हीट**

मी यातील थर्डपार्टी अर्जदार **क्र. ४ श्री. साताप्पा तुकाराम कांबळे,**, व.व. ६५ धंदा - शेती, रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुा राधानगरी

ता. २३.०२.२०२६

I know applicant

(Adv. S.P. Wagavekar)

Assistant Superintendent

**<u>प्रतिज्ञा</u>**

मी यातील थर्डपार्टी अर्जदार **क्र. ४ श्री. सातापा तुकाराम कांबळे,,** व.व. ६७ धंदा - शेती, रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर,सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज राधानगरी

ता. २३.०२.२०२६

श्री सातापा तुकाराम कांबळे

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Satappa Tukaram Kamble.
Age 67 Occu. Agri
of Sarvade Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. S.P. Wagvekar
Adv. Whom I Know personally
Dated 23/2/2026

Assistant Superintendent